National - Journal
Registration No. 3341/2010

IIFS Impact Factor (*IIFS*) 5.25
Vol. No. 26 June/July 2021
ISSN No. 2277-4858

# THE KONKAN GEOGRAPHER

**Interdisciplinary Peer Review Refereed National Research Journal**

Half-Yearly

KONKAN GEOGRAPHERS' ASSOCIATION OF INDIA

**Co-Editor**
**Dr. S. A. Thakur**

**Chief-Editor**
**Dr. R. B. Patil**

KONKAN GEOGRAPHERS' ASSOCIATION OF INDIA
SINDHUDURG, MAHARASHTRA - 416602

# KONKAN GEOGRAPHERS' ASSOCIATION OF INDIA

**(Registration No. 3341/2010 sindhudurg, MS, INDIA)**

## DIRECTOR BODY 2020-2025

| | | |
|---|---|---|
| Dr. Shivaram Thakur | PRESIDENT | S. P. K. College, Sawantwadi, Sindhudurg |
| Dr. Ramchandra Katkar | VICE-PRESIDENT | S. K. Patil College Malvan, Sindhudurg |
| Dr. Rajaram Patil | SECRETARY | A & C College Phondaghat, Sindhudurg |
| Dr. Sudhir Buva | JOINT SECRETARY | S. P. K. College, Sawantwadi, Sindhudurg |
| Dr. Sambhaji Patil | TREASURER | Kankavli College Kankavli, , Sindhudurg |
| Dr. Hemant Pednekar | ADVISOR | Ex. Vice Principal, Kirti College, Mumbai |
| Prof. Hanmantrao Yadav | DIRECTOR | S. R.M. College, Kudal, Sindhudurg |
| Dr. Sumedha Dhuri | DIRECTOR | J.B.Naik. College, Sawantwaadi, Sindhudurg |
| Dr. Balu Rathod | DIRECTOR | Kankavli College, Kankavli, , Sindhudurg |
| Dr. Pradnyakumar Gatade | DIRECTOR | Laximibai Halbe College, Dodamarg |
| Dr. Balasaheb Rahane | DIRECTOR | Sonopant Dandekar College, Palghar |
| Prof. Kamlesh Kamble | DIRECTOR | Br. Khardekar College, Vengurla |
| Prof. Rajkumar Kamble | DIRECTOR | ASC College, Unde, Tal: Uran, Raigad |
| Dr. Pooja Mohite | DIRECTOR | S.P. Hegshetye College, Ratnagiri |
| Prof. Nisha Deodhar | DIRECTOR | Manjunatha College of Commerce, Thane |

Our Konkan Geographers' Association of India, is publishing from 2012 National level Interdisciplinary peer reviewed Journal and from 2020 with Impact Factor ***(IIFS)*** 5.25. KGAI also publishes Geographical Text and Reference books in Marathi and English medium. The life membership is opened to all researcher and geographers from India and abroad. We have organized 11 National and 02 International (online) level conferences in various states of India.

Journal Volume No. 26, June/July 2021
THE KONKAN GEOGRAPHER
ISSN No.2277-4858, Impact Factor IIFS 5.25
National Interdisciplinary Peer Review Refereed Research Journal of the
KONKAN GEOGRAPHERS' ASSOCIATION OF INDIA

# INDEX


| Sr. No. | Name of the Research Paper | Author | Page No. |
|---|---|---|---|
| 1 | Geomorphic Landforms and its Analysis of The Ajodhya Hills, Purulia, West Bengal. | Mr. Vivek Chandra<br>Dr. Abhay K.Singh | 1 |
| 2 | Ruined Cultural Heritages of the Ancient Venkundranadu Kingdom Site of Palakkad District, Kerala State, India | Dr. V. Sanalkumar | 15 |
| 3 | Impact of Shangrila Waterpark Resort- Bhivandi Maharashtra. | Mrs. Nisha Deodar<br>Dr. S. A. Thakur | 20 |
| 4 | A Review of the Geographical Concerns of Municipal Solid Waste (MSW) for Mumbai Megacity. | Dr Chandani Bhattacharjee | 28 |
| 5 | Soil Based Cottage Industries in the District of Purulia, West Bengal with Special Reference to its General Problems. | Dr. Falguni Gupta<br>Dr. Satyapriya Mahato<br>Dr. Surajit Dutta | 38 |
| 6 | Sustainable Environmental Management And Floriculture | Ranjana Rathod<br>Dr. Balu Rathod | 53 |
| 7 | Increasing Population and Changing Land use Pattern in Uran Taluka of Raigad District Maharashtra | Rajkumr Kamble<br>Dr.Rajaram Patil | 57 |
| 8 | Raja Rao's Kanthapura as Post-Colonial Novel | Santosh M. Akhade | 66 |
| 9 | Drinking Water and Sanitation Facility in India: Inter State Analysis | Dr. Babasaheb K. Wani<br>Dr. Ramakant N. Kaspate | 69 |
| 10 | नाशिक जिल्ह्यातील तहसीलनिहाय लोकसंख्येच्या घटकाचा अभ्यास | प्रा .डॉ बाळासाहेब चकोर,<br>प्रा. डॉ.आशाली खारके | 78 |
| 11 | रत्नागिरी जिल्ह्यातील जमिनीचा वापर आणि जलशिनाचानाच्या साधनाचा : चिकित्सक अभ्यास | प्रा. सौ. अनुपमा आर. कांबळे<br>प्रा. राजकुमार डी. कांबळे | 84 |
| 12 | फलोत्पादन विपणन संधी आणि आव्हाने | डॉ. बी. डी. इंगवले | 90 |

THE KONKAN GEOGRAPHER
Interdisciplinary Peer Reviewed/Refreed Research Journal
Vol. No. 26Jun/July, 2021

# फलोत्पादन विपणन संधी आणि आव्हाने

**डॉ. बी. डी. इंगवले,**
**आनंदीबाई रावराणे कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वैभववाडी**

**Research Paper Accepted on 26-12-2019 Edited on 05-01-2020**

## प्रस्तावनाः -

*फळे ही मानव प्राण्यांची अन्न म्हणून प्राचीन काळपासून ज्ञात आहेत. आपल्या वेदपूराणात व धार्मिक ग्रंथांत फळाचा उल्लेख आहे. पूर्वीच्या काळी फळ देवाला वाहण्यासाठी व उच्चभ्रु लोकांच्या अहारातील महत्त्वाचा आहार म्हणून गणला जात आहे. आंबा हे फळ भारतात चार हजार वर्षापासून अस्तित्वात असल्याचा संदर्भ मिळतो. ब्रिटीश राजवटीत कालव्याच्या व दळणवळणाच्या सोयी वाढल्यामुळे भारतात फळबागायत खूप वाढली.*

**फलोत्पादनाचा अर्थ-** "फळांच्या बागेमध्ये केलेली मशागत म्हणजे फलोत्पादन होय." फलोत्पादन ही एक अशी कला आहे की, ज्यामध्ये मशागत, उत्पादन प्रकिया, विपणन ई. विविध प्रकिया संदर्भात केल्या जातात आणि त्यात विज्ञानही आहे.

## फलोत्पादनाचे महत्त्वः

### फळाचे आहारात महत्त्वः-

* फळाचे औशधी द्रव्य म्हणून महत्त्व.
* फळ लागवडीचे आर्थिकदृष्ट्या महत्त्व.
* फळे आणि फळ उत्पादनापासून करत येणारे प्रक्रियायुक्त पदार्थ
* सौंदर्यदृष्ट्या फळझाडांचे महत्त्व.
* फळबाग लागवडीतून रोजगार निर्मिती.

### फलोत्पादन जागतिक पार्श्वभूमीः

भारताची फळे निर्यातीची बाजारपेठ युरोप असून त्यामध्ये फ्रन्स, ऑस्ट्रेलिया, बेल्जियम डेन्मार्क स्वीडन, नार्वे, जर्मनी इंग्लंड या देशांचा समावेश होतो. भारतीय फळे व भाजीपाला यांना युरोपीयन आहारात महत्त्वाचे स्थान आहे. भारताला मॉरिशसला फळे निर्यातीसाठी खूप मोठी संधी उपलब्ध आहे. मॉरीशस भारतातून सफरचंद, लिंबू द्राक्षे, आंबे आणि इतर फळे मोठ्या प्रमाणात आयात करायला तयार आहेत. जगात ब्राझील, चीन, इंडोनेशिया, ऑस्ट्रेलिया, भारत इत्यादी देश

फलोत्पादनात प्रमुख आहेत. ब्राझिल, चीन नंतर भारताचा दुसरा क्रमांक लागतो. आंबा, काजू उत्पादनामध्ये भारताच जगामध्ये प्रथम क्रमांक लागतो. परंतु निर्यातीतील वाटा अगदी नगण्य म्हणजे 1% इतकाच आहे. आंब्याच्या निर्यातीसाठी राज्यातील कृषी पणन मंडळ प्रयत्नशील आहे. आजही 240 द.ल. हेक्टर जमीन फलोत्पादन शेतीसाठी योग्य आहे. भारतात भरपूर सूर्य प्रकाश अतिरीक्त मनुष्यबळ फलोत्पादनासाठी देशांतर्गत जास्त मागणी इत्यादीमुळे भारतात फलोत्पादन शेतीचा विकास करणे शक्य आहे.

**संशोधनाचे महत्त्वः-**

1) महाराष्ट्रात जास्त अवर्षण असणा-याभागात तेथील हवमानात कमी पावसावर येणा-या फळबाग लागवडीमुळे शेतक-यांचा आर्थिक पाया मजबुत होईल.

2) देशात आणि महाराष्ट्रातील लाखो हेक्टर पडीक जमीन फळबाग लागवडीखाली येऊन शेतीचा विकास होईल.

3) कोरडवाहू आणि बागाईत अशा दोनही प्रकारच्या फळबाग लागवडीमुळे नवीन पीक आकृतीबंध अस्तित्वात येईल.

4) निर्यात माल म्हणून फळे-भाजीपाला-फुले यांना आंतरराष्ट्रीय बाजारात मोठी मागणी असलेने परकीय चलन मिळेल.

5) फळबाग विकासामुळे स्थानिक भागात मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होईल.

**गृहितकः-** फलोत्पादन लागवड आणि विपणनामुळे राज्याच्या आर्थिक विकासात आणि रोजगार संधीत वाढ होईल.

**संशोधनाची उद्दीष्टेः**

1) महाराष्ट्रातील फलोत्पादन लागवड विकासाचा अभ्यास करणे.

2) फलोत्पादन विपननामुळे बदललेल्या आर्थिक परिस्थितीचा अभ्यास करणे.

**संशोधन पध्दती-** सदर संशोधन विषयाचे महत्त्व लक्षात घेता योग्य अशी संशोधन पध्दती अभ्यासासाठी स्वीकारण्यात आली आहे.

**माहितीसंकलनः** सदरसंशोधनाकरीता आवश्यक असणारे दुय्यम माहितीही विविधप्रकारचे शासकीय अहवाल व विविध संशोधन संस्थांच्या अहवलातून गोळा करण्यात आले आहे.

**महाराष्ट्रातील भूमी उपयोजनः-** महाराष्ट्रातील भौगोलिक क्षेत्रफळ 307.58 लाख हे. आहे. त्यापैकी कोणत्या क्षेत्रात किती जमीन उपयोजनात आहे. तसेच शेती क्षेत्रास किती जमीन वापरली जाते हे खालील तक्त्यावरून स्पष्ट होते.

**महाराष्ट्रातील जमीनीचा वापर (हजार हेक्टर)**

| तपशिल | 1960-61 | 1990-91 | 2000-01 | 2016-17 |
|---|---|---|---|---|
| 1) क्षेत्रफळ | 30,758 | 30,758 | 30,758 | 30,758 |
| 2) कृषीकरीता उपलब्ध नसलेली जमीन | 2,495 | 2,713 | 2,997 | 3,131 |
| 3) कृषी खाली नसलेली जमीन (कुरणे, झुडपे, मशागत योग्य) | 2,559 | 2,392 | 2,470 | 2,416 |
| 4) पडीक जमीन | 2,414 | 1,961 | 2,360 | 2,519 |
| 5) कृषीखालील क्षेत्रफळ | 1,880 | 1,950 | 2,170 | उ. ना. |
| 6) पीकाखालील एकूण क्षेत्रफळ | उ.ना. | 21,859 | 22,256 | 22,557 |

महाराष्ट्रातील जमीनीचा वापर अध्ययनामध्ये महाराष्ट्राच्या एकूण 30,758 हजार हे. क्षेत्रफलापैकी 1960-61 पासून 2016-17 याकाळात कृषीकरीत उपलब्ध नसलेल्या जमीनीचे क्षेत्र 2,495 हजार हे. वरून 3,161 हजार हे. पर्यंत वाढ झालेली आहे. कायम कुरणे झाडे झुडपे मशागत योग्य पडीक जमीनीच्या क्षेत्रामध्ये घट होत असल्याचे आकडेवारीवरून आढळून येते. चालू व अन्य पडीक क्षेत्रामध्ये मात्र सन 1960-61 ते 2016-17 या कालावधीमध्ये चढ-उतार दिसून येतात. महाराष्ट्रात पीकाखालील एकूण क्षेत्रफळात सन 1990-91 पासून 2016-17 या कालावधीत क्षेत्रफळात वाढ झालेली दिसून येते. म्हणजेच महाराष्ट्रात पिकाखालील एकूण क्षेत्रात वाढ झालेली आहे.

**महाराष्ट्रातील फलोत्पादन विपणन सध्यःस्थिती आणि आव्हाणेः**

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनामध्ये अग्रेसर असून राज्यात मोठ्याप्रमाणात फले व भाजीपाला पीकांची व्यावसायीक दृष्टीकोणातून लागवड करून निर्यातक्षम दर्जाच्या मालाचे उत्पादन करण्याकडे शेतक-यांचा कल वाढत आहे. खुल्या जागतिक व्यापारामध्ये कृषीमाल निर्यातीसाठी जागतीक बाजारपेठेत मोठ्याप्रमाणात संधी निर्माण झाली आहे.

राज्यात उत्पादीत होणा-या शेतमालांचे बाजारमूल्य साधारणतः अडीज ते तीन लाख कोटी रूपये एवढे प्रचंड आहे. राज्यात अस्तित्वात असणा-या सुमारे 300 कृषी उत्पन्न बाजार समित्यामधून 40 ते 50 हजार कोटींचे व्यवहार होतात. अन्न धान्य, भाजीपाला व फळे यांचे विपणन पूर्णतः

बाजारसमित्यांमध्ये एकवटले आहे. कारण शेतक-यांच्या मालाची विक्री करण्यासाठी आवश्यक व्यवस्था उभी करून स्पर्धात्मक दर मिळवून देणे या उद्देशानेच बाजरसमित्या स्थापन करण्यात आलेल्या आहेत. पण ज्यांना बाजार घटक म्हटले जाते ते व्यापारी, अडते, हमाल, मापाडी हे संघटीत तर शेतमाल विक्रीस आणनारे शेतकरी असंघटीत असे चित्र सर्वत्र दिसते. त्यामुळे जीवापाड मेहनत घेऊन उत्पादन घेणा-या शेतक-याला कमी मोबदला आणि साखळीतील इतर घटकांना मोठा नफा असे असंतूलन पणन क्षेत्रात निर्माण झाले आहे.

महाराष्ट्र राज्य हे फलोत्पादनमध्ये अग्रेसर असून खूल्या जागतिक व्यापारामध्ये कृषीमाल निर्यातीसाठी जागतिक बाजारपेठेत मोठ्या संधी निर्माण झाल्या आहेत. राज्यात द्राक्षे, डाळींब, आंबा, कांदेव इतर भाजीपाला पिकांचे उत्पादन घेतले जाते आणि त्याची विविध देशांना निर्यात केली जाते. यामध्ये महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा आहे. एकूण देशाच्या निर्यातीपैकी 98% द्राक्षे, 76 % आंबा 49% कांदा, 27% इतर फळे, 18% भाजी पाल महाराष्ट्रातून निर्यात होतो. म्हणून महाराष्ट्र राज्य फळपिकांच्या उत्पादनात व निर्यातीमध्ये अग्रेसर आहे.

| अ. क्र. | पिके | क्षेत्र (000 हे.) | | उत्पादन (00 मे.टन) | | महाराष्ट्राची टक्केवारी | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | भारत | महाराष्ट्र | भारत | महाराष्ट्र | क्षेत्र | उत्पादन |
| 1 | फळे | 7216 | 741 | 88977 | 12162 | 10.00 | 13.60 |
| 2 | फुले | 255 | 8 | 2296 | 445 | 3.10 | 19.30 |
| 3 | भाजीपाला | 9396 | 557 | 162896 | 14795 | 5.90 | 9.00 |
| | एकूणः | 16867 | 1306 | 254169 | 27402 | 7.74 | 10.78 |

भारतातून फळे, भाजीपाला व फुले यांची युरोपीयन युनियन व इतर देशांना निर्यात केली जाते. 1997-98 मध्ये 148 कोटी तर 2016-17 मध्ये 17663 कोटीची फळे भाजीपाला व फुले यांची निर्यात करण्यात आली आहे. दरवर्षी त्यात वाढ होताना दिसते.

सन 1995 पासून देशात व राज्यात फळे भाजीपाला फुले या पिकांची व्यावसायिक पध्दतीने शेती करण्याकडे व आधुनिक तंत्रज्ञानाच वापर करून चांगल्या दर्जाचे उत्पादन करण्याकडे शेतक-यांच कल सातत्याने वाढत आहे. राज्यातून युरोपियन युनियन व इतर देशांना फळे व भाजीपाला पिकांची मोठ्याप्रमाणात निर्यात होत आहे.

देशातून होणारी ताजी फळे निर्यात सन 2016-17 (निर्यात मे. टन व मूल्य कोटी रु. मध्ये)

| महाराष्ट्र | | | भारत | | राज्याचा हिस्सा (%) | |
|---|---|---|---|---|---|---|
| कृषीमाल | निर्यात | निर्यात मूल्य | निर्यात | निर्यात मूल्य | निर्यात | निर्यात मूल्य |
| द्राक्षे | 187296 | 1960 | 232940 | 2088 | 80 | 94 |
| आंबा | 37180 | 368 | 53177 | 446 | 70 | 83 |
| केळी | 38487 | 130 | 110872 | 388 | 35 | 34 |
| डाळींब | 25568 | 372 | 49755 | 490 | 59 | 76 |
| इतर फळे | 60627 | 303 | 249312 | 981 | 24 | 31 |

खूल्या जागतिक व्यापार करारामुळे कृषीमाल निर्यातीसाठी जागतिक बाजारपेठांमध्ये मोठ्याप्रमाणात संधी निर्माण झाल्या असल्यातरी काही आव्हाने निर्माण झालेली आहेत. निर्याती बरोबरच त्यांची गुणवत्ता किड व रोग मुक्त मालाची थेट शेतक-यापर्यंतची ओळख यांना बाजारपेठेतही विशेष महत्त्व प्राप्त झाले आहे. शेतमालाच्या उत्पादन विक्री बाबात शेतक-यांनी पुढे येत खाजगी उद्योजक निर्यातदार यांचेशी कंत्राटी शेतीचे करार करून पिकांचे योग्य नियोजन करून शेतक-यांच्या विकासासाठी कायद्यात बदल केलेले आहेत.

अमेरीकेपासून मलेशिया फिलीपाईन्स पर्यंत देशात 70 ते 80% शेतमालावर प्रक्रीया केली जाते. आपल्याकडे हे प्रमाण 2 ते 3 % पेक्षा जास्त नाही. मूलभूत सोयीचा अभावाचा फायदा व्यापारी व दलाल मोठ्याप्रमाणावर घेतात. तालुका गाव पातळीवरील शेतक-यांच्या गटांनी गोदाम आणि प्रक्रीया उद्योगांची छोटी-छोटी केंद्रे उभारली तर निश्चितच शेतक-यांच्या मालाला योग्य भाव मिळू शकतो.

पणन कायदा सुधारणे महाराष्ट्र राज्य देशात अव्वल क्रमांकावर आहे. महाराष्ट्र कृषी पणन मंडळ ही पायाभूत सुविधासह शीत साखळीचा विकास निर्यात क्षेत्रात काम करीत आहेत. त्यामध्ये समन्वयाचा अभाव निर्माण झाला आहे. तो टाळण्यासाठी प्रयत्नशील आहे. राज्याचे पणन मंत्री व सचिव यांच्या प्रयत्नातून जागतिक बँक, आशियायी विकास बँक आणि युनो या संस्थेमार्फत राज्यातील पणन व्यवस्था बळकट केल्यास त्याचा लाभ शेतक-यांना होणार आहे. महाग्रेप्स या सहकारी संस्थेमार्फत राज्यातून नव्हेतर देशातूनही मोठ्या प्रमाणावर द्राक्षांची निर्यात केली जाते. आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्ये महाग्रेप्सचा ब्रँड लोकप्रिय झालेला आहे. पणन मंडळाने महाग्रेप्सच्या धर्तीवर आंबा, संत्री, केळी, डाळींब यांच्या विपणन व निर्यातीसाठी महामँगो, महाआऍरेंज, महाबनाना, महाअनार या भागीदारी तत्त्वावरील संस्थांची स्थापन केली आहे. पणन मंडळाकडून केशर हापूस या आंब्यांची जपान अमेरीकेत निर्यात होण्यासाठी चालना दिली जात आहे.

शेतमाल विपणन साखळीतील महत्त्वाचा घटक शेतकरी अनेकदा दुर्लक्षित दिसून येतो. त्याचेही काही दोष आहेत. 4 ते 6 महिने डोळ्यात तेल घालून पीक घेणारा शेतकरी माल विक्री

करताना बेफिकीरपणे निर्णय घेतो. उदा. शेतमाल टेंपो ड्रायव्हरच्या हवाली अडत्याने किती भाव दिला, किती कटती लावली, हिशोब न घेताच बिले घेतो. त्यामुळेच शेतकरी आत्महत्येचे प्रमाण वाढत आहे. शेतक-याने दर्जेदार उत्पादनाबरोबरच मार्केटींग तंत्राचा अवलंब शिकून घेतला पाहिजे. पिक निहाय दबाव गट तयार करावा. तरच त्याचे अस्तित्व निर्माण होईल. शासनाने जिल्ह्याच्या ठिकाणी 10 x 10 फुट एवढ्या मोक्याच्या जागा उपलब्ध करून थेट शेतमाल विक्री केंद्रे उपलब्ध करावेत त्यामुले स्वयं रोजगारही निर्माण होईल. ग्राहकांना योग्यदर आणि शेतक-यांचे आर्थिक प्रश्न सुटतील.

**संदर्भ सूचीः-**


1) मराठी विश्वकोष (1981), संपादक तर्कतीर्थ श्री लक्ष्मण शास्त्री जोशी महाराष्ट्र राज्य साहित्य व सांस्कृती मंडळ मुंबई, खंड 10 पान नं.816-818.

2) Meena R. K. & Yadav J. S. (2001), Horticulture Marketting and post harvest management, Pointing publisher Jaipur, Page No.1, 2, 4, 8

3) मुल्लानी / लोहकरे महाराष्ट्रातील शेती, डांयमंड प्रकाशन पुणे, पान नं. 9-10

4) श्री. गोविंद हांडे (जुन 2019 ) फलोत्पादन पिकाच्या उत्पादन निर्यातीत अन्न सुरक्षिततेचे महत्त्व, कृषी पणन मित्र संपादक-दिपक शिंदे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, पान नं. 5-7

5) श्री. सुनिल पवार (आगस्ट 2017) कृषीमाल विपणन संधी आणि आव्हाणे, कृषी पणन मित्र संपादक-दिपक शिंदे, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ पुणे, पान नं. 13

# THE KONKAN GEOGRAPHER

(National Level Interdisciplinary and Peer Reviewed /Refereed,Research Journal of the Konkan Geographers' Association of India Registration No. 3341/2010, Sindhudurg)

**ISSN 2277- 4858 (Impact Factor - 5.25)**

## Form IV

| | |
|---|---|
| Place of Publication | - Kankavli (Sindhudurg) |
| Periodicity of the Publication | - Half Yearly |
| Printers Name | - Supreme Printers, Kankavli |
| Publishers Name | - Dr. R. B. Patil |
| Nationality | - Indian |
| Address | - Teachers' Colony, Havelinagar, Phondaghat Tal:Kankavli Dist:Sindhudurg. MS (India) |
| Editors Name | - Dr. R. B. Patil |
| Nationality | - Indian |
| Adress | - Teachers' Colony, Havelinagar, Phondaghat Tal:Kankavli Dist:Sindhudurg. MS (India) |
| Name of the Owner & Address | - Dr. R. B. Patil Secretary, Konkan Geographers' Association of India |

I, Dr. R. B. Patil herby declare that the particulars given above are true to the best of my knowledge and belief.

Date – 05/03/2021

sd/

Dr. R. B.Patil